रे. दिवाणी मुकदमा क्र. १४२/२०१३ मधील निशाणी क्र. १९८ वरील आदेश

(शहाजी करांडे वि हणमंत करांडे व.)

(CNR No. MHSN130005102013)

१. वादी यांनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व ऑ. ३९ रुल १, २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीत सरसनिरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकामी सदरचा दावा दाखल केलेला आहे. प्रवादी क्र.१ हे वादीचे वडील असून ते १४/०९/२०२० रोजी मरण पावले. त्यांना वादी व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. दावा मिळकती या मयत प्रवादी क्र.१ याच्या वडिलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती होय. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.३ ते ७ यांना दावा मिळकतीमध्ये कसलाही मालकीहक्क व प्रत्यक्ष कब्जेवहिवाट कधीही नव्हती. प्रवादी क्र.७ ही प्रवादी क्र.१ यांची द्वीतीय पत्नी व प्रवादी क्र.१ बरोबर वादीची आई पदमिनी ही हयात असताना विवाह झालेमुळे तिचा विवाह मुलतः रददबातल व बेकायदेशीर असलेने प्रवादी क्र.३ ते ६ ही अनौरस संतती होय. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दावा मिळकतीमध्ये मेहनत मशागत करुन ऊसाचे पिक केलेले आहे. दावा चालू असताना प्रवादी क्र.१ हे मरण पावलेवर प्रवादी क्र.७ हिने गट क्र. ३४६/२ या जमिनीतील ऊसाचे पिक अनाधिकाराने तोडून सोनहिरा कारखाना येथे दिले आहे व प्रवादी क्र.३ ते ७ हे त्या बिलाची रक्कम घेणेच्या तयारीत

असलेने १९/११/२०२० रोजी वादींनी रजिस्टर्ड नोटीस पाठवली. तथापि प्रवादी क्र.३ ते ७ त्यास जुमानत नसलेने वादी यांनी राहिलेला ऊस तशाच प्रकारे नेवू नये व तुटून गेलेल्या ऊसाचे बिल वादींना मिळावे या कारणास्तव तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रवादी क्र. २ ते ७ यांच्यावतीने नि. २०३ वर म्हणणे सादर करणेत आले. प्रवादी क्र.१ १४/०९/२०२० रोजी मरण पावले व्यतिरिक्त अर्जातील सर्व मजकूर खोटा असलेचे त्यांनी म्हटलेले आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.१ चे प्रवादी क्र.२ ते ७ वारस असलेचे वादीनी नि.१८८ च्या प्रतिज्ञापत्रावर मान्य व कबूल केलेले आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी कधीही शेतीमध्ये वहिवाट नसलेचे यापूर्वी मान्य व कबूल केलेले आहे. ती सर्व माहिती खोटी नमूद केली असून प्रवादी क्र.१ व २ ते ७ यांनी जून २०१९ मध्ये ऊसाची लागण केलेली होती. तर ऊस तोडणीची तारीख ०८/११/२०२० अशी आहे. त्यामुळे ३०/०९/२०२०, ०३/१०/२०२०, ०५/११/२०२० अशी ती खताची बिले दाखल केलेली आहेत ती सर्व बनावट आहेत. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी नि. ५० वर असाच अर्ज पूर्वी दाखल केलेला होता. तो रदद झाला. तरी तशाच स्वरुपाचा अर्ज त्यांनी पुन्हा सादर केलेला आहे. वादी यांनी इतर पुराव्यामध्येसुध्दा प्रवादी यांचीच वहिवाट मान्य व कबूल केली असून ऑ. २० रुल १२ प्रमाणे दरम्यानचे उत्पन्न ते स्वतंत्ररीत्या मागू शकत असलेने अशा प्रकारचा अर्ज दाव्यातील पुरावा प्रलंबित असताना चालू शकत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रदद

करणेविषयी विनंती केलेली आहे.

४. वादी यांचे विद्वान वकील श्री. ए.डी. घाडगे व प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. पी.टी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| अ.क्र. | गुण | उत्तर |
|---|---|---|
| १ | वादी यांना तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २ | परिस्थितीचा समतोल हा कोणाचे बाजूने आहे. ? | प्रवादीच्या बाजूने. |
| ३ | मनाई दिलेस दावा मिळकतीचे नुकसान रोखता येवू शकते काय ? | होय. |
| ४ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

५. वादी यांचे विद्वान वकील श्री. ए.डी. घाडगे यांनी नि.२०० च्या यादीसोबत ऊस पिकाला खत घातलेबाबतच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.७ हिने ऊसाचे बिल बळकावणेसाठी प्रवादी क्र.१ च्या मृत्यूनंतर पिकाची नोंद स्वतःच्या नांवे करुन घेतली व ऊसाचे पिक साखर कारखान्याला पाठवले.

वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.७ हिचा प्रवादी क्र.१ यांचेसोबत असणारा विवाह हा बेकायदेशीर आहे. तर प्रवादी क्र.२ ते ६ ही अनौरस संतती असलेने त्यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क प्राप्त होवू शकत नाही. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या वडिलांसोबत तेच दावा मिळकत वहिवाटत असे व उत्पन्न घेत असे. तर प्रवादी यांनी ऊसाच्या बिलाची रक्कम घेणेसाठी तो अन्य नावाने कारखान्यात पाठवलेला आहे. प्रवादी याशिवाय उर्वरीत ऊससुध्दा बळकावणेचे प्रयत्नात असलेने तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी वादीनी विनंती केलेली आहे. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. पी.टी. जाधव यांनी युक्तीवाद सादर केला की ऊसाचे पिक जे लावले जाते ते लहान असताना त्याला सुरवातीच्या पाच ते सहा महिन्याच्या कालावधीमध्ये रासायनिक खताचा ढोस दिला जातो. वादातील ऊसाची नोंद जर पाहिली तर ती जून २०१९ ची असून वादीनी दाखल केलेली सर्व बिले ही ऊस तुटून गेला त्या कालावधी नजीकची आहेत. त्यामुळे ती वादातीत पिकाशी संबंधीत नाहीत. प्रवादी क्र. २ ते ७ यांच्या विद्वान वकीलांनी पुढे युक्तीवाद सादर केला की दाव्यातील कथन व पुरावा जर पाहिला तर वादी प्रत्यक्षरीत्या नाशिक येथीलच रहिवाशी असून तो कधीही दावा मिळकतीत गेला नव्हता हे त्याने मान्य व कबूल केलेले आहे. त्यामुळे वादीनी केलेली विनंती ही निव्वळ कायदेशीर प्रक्रियेला बगल देणेसाठी केली असलेने अर्ज रदद होणेविषयी विनंती केलेली आहे.

६. वादी व प्रवादी यांच्या विद्वान वकीलांनी सादर केलेला युक्तीवाद ऐकलेवर व दाव्यातील कागदपत्रे पडताळून पाहिलेवर वादीनी नि.५० वर अशाच प्रकारचा अर्ज

केला होता ही गोष्ट स्पष्ट होते. दाव्यातील कथनांवरुन वादी कायमस्वरुपी नाशिक येथे वास्तव्यास होते हीही गोष्ट स्पष्ट होते. वादी यांचे प्रवादी क्र.१ यांचेशी पटत नसलेनेच त्यांनी दावा दाखल केला असलेचे मान्य व कबूल केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी दावा मिळकत वहिवाटत होता असे म्हणता येवू शकत नाही. प्रवादी क्र.७ चा विवाह बेकायदेशीर आहे की काय याबददल आता वक्तव्य करता येवू शकत नाही कारण दाव्यातील पुरावा होणे बाकी आहे. प्रवादी क्र.२ ते ६ औरस आहेत किंवा अनौरस आहेत व त्याना दावा मिळकतीत काही हक्क आहे किंवा नाही याबददलचे कसलेही वक्तव्य वादी दाव्याचा निकाल झालेशिवाय करु शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेली विधाने निराधार असलेचे दिसून येते. त्यामुळे वादी यांना तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी प्रथमदर्शनी केस नसलेचे स्पष्ट होते. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

**<u>गुण क्रमांक २</u>**

७. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचा तो एकमेव कायदेशीर वारस आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यामुळे दावा मिळकतीतून प्राप्त होणारे उत्पन्न त्याला एकटयालाच मिळणे क्रमप्राप्त आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.१ च्या मृत्यूनंतर बेकायदेशीररीत्या प्रवादी क्र.७ हिच्या नावावर ऊस कारखान्यास पाठविणेत आला व त्याचे बिल प्रवादी क्र.२ ते ७ हे घेवू इच्छीतात. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करुन संबंधीत बिल रोखावे. तसेच इतरही पिक कारखान्याला प्रवादींनी पाठवू नये म्हणून मनाई देणेत यावी.

८. वादी यांनी केलेली जर विनंती पाहिली तर वादी ज्या ऊसाचे व बिलाचा उल्लेख करत आहेत त्याची गणना सहजपणे पैशाच्या स्वरुपात करता येवू शकते. जरी वादी यांनी त्या रकमेवर त्यांचा हक्क असलेचे सिध्द केले तरी तशाप्रकारे आदेश करुन ती सर्व रक्कम त्यांनाही प्राप्त होवू शकते. या घडीला जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्यावरुन ऊसाचे पिक प्रवादी क्र.१ यांचे नांवे प्रवादी क्र.२ ते ६ यांनी नोंदवले असलेचे स्पष्ट होते. ऊसाचे पिक नोंदवलेपासून त्याची देखभाल करुन ते पिक तयार होईस्तोपर्यंत प्रवादी क्र.२ ते ६ यांनी मेहनत केली असलेचाही तर्क प्राप्त होतो. प्रवादी यांना त्या मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही हे दाव्याअंती स्पष्ट होवू शकते. परंतू प्राप्त असणा-या कागदपत्रांवरुन त्यांच्या मेहनतीद्वारे निर्माण झालेले पिक त्यांनी कारखान्याला पाठवले असलेचे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये त्यांना बिलाची रक्कम जर मिळाली नाहीतर निश्चितच त्यांना शेती करणे अशक्य ठरु शकते. तसेच दावा मिळकतीविषयी असणारे दैनंदिन व्यवहार पार पडणेही अशक्य होवू शकते. ज्याची गणना पैशाच्या स्वरुपामध्ये कधीही करता येवू शकत नाही. त्यामुळे परिस्थितीचा समतोल हा प्रवादीच्या बाजूने आहे.

**<u>गुण क्रमांक ३</u>**

९. वादी यांचे विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की न्यायालयाला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे असणारे जे अधिकार आहेत ते वापरणेसाठी योग्य अशी ही केस आहे व या कारणास्तव त्यांनी '' **ए.आय.आर. १९९५ सुप्रिम कोर्ट**

**<u>३५० महाराष्ट्र राज्य वि अदमाने अनिता मोती</u>** या केसचा आधार घेतलेला आहे. त्यात नमूद असणा–या न्यायनियमाप्रमाणे तुर्तातुर्त आदेशाद्वारे न्यायालय वादातील पक्षकारांचे हित अंतीम सुनावणी होईस्तोपर्यंत सुरक्षित रहाणेसाठी आपल्या अधिकाराद्वारे आदेश पारीत करु शकते. ''

१०. वादी यांनी सादर केलेला न्यायनियम जर पाहीलातर वादी यांच्या तो हितात नसून तो प्रवादी यांच्या हिताचा असलेचे दिसून येते. वादी यांनी पूर्वी नि.५० वर जो अर्ज केलेला होता त्याच स्वरुपाचा अर्ज त्यांनी पुन्हा केलेला आहे. तो फक्त प्रवादी क्र. १ यांच्यापश्चात केला आहे. त्या अर्जातील आदेश जर पाहिले तर त्याद्वारे सर्व परिस्थिती वादी यांच्या निदर्शनास आणून देणेत आली असलेचे दिसून येते. असे असतानाही प्रवादी क्र.१ च्या मृत्यूनंतर सदरचा अर्ज वादीनी दाखल केला असलेचे दिसून येते. त्यामुळे न्यायनियमामध्ये नमूद असणारा नियम जर पाहिला तर तो प्रवादी यांच्या हिताचा असलेचे स्पष्ट होते.

११. वादी यांनी सदर अर्जाचे कामी तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी विनंती केलेली आहे. या दावेचे कामी पुर्वी जो पुरावा नोंदविणेत आलेला आहे त्यावरुन वादी हे नाशिक येथे वास्तव्यास असतात ही गोष्ट त्यावरुन स्पष्टपणे दिसून येते. ते दावा मिळकत वहिवाटत नसलेचेही त्यांनी मान्य व कबूल केलेले आहे. दावा मिळकतीच्या सुधारणेसाठी इले. मोटार व पाईपलाईनसाठी कर्ज घेतले असलेचेही दाव्यातील पुराव्यावरुन स्पष्ट होते. वादातील पिक हे प्रवादी यांनीच लावले असून ते कारखान्याला पाठवले असलेचाही तर्क

प्राप्त होतो. अशा परिस्थितीमध्ये जर मनाई आदेशाद्वारे प्रवादी यांना मनाई करणेत आली तर निश्चितच दावा मिळकतीचे नुकसान संभवते. तसेच वैयंक्तीकरीत्या प्रवादी यांचेही नुकसान संभवते. त्यामुळे गुण क्रमांक ३ चे उत्तर होय म्हणून देणेत येते.

१२. वादी यांनी सदरचा अर्ज तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादी यांनी केलेली विनंती जर पाहिलीतर यापूर्वीही अशा स्वरुपाचा अर्ज करुन त्यांनी दावा मिळकतीत हक्क असलेचे प्रतिपादन केलेले आहे. सदरचा दावा सुनवाई होवून निकाली होत नाही तोपर्यंत वादी किंवा प्रवादी यांचे दावा मिळकतीत असणारे हक्क निश्चित होवू शकत नाहीत. सध्यःस्थितीला दावा मिळकतीमध्ये असणारी परिस्थिती आहे तशीच रहावी या कारणास्तव पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

**आदेश**

१. वादीचा अर्ज रदद करणेत येतो.

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2021.01.16 11:40:17 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – १५/०१/२०२१ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : M.G. Buchade, (Grade III)

Court : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon

| | |
|---|---|
| Date | : 15/01/2021 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 15/01/2021 |
| Order uploaded on | : 16/01/2021 |